ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ३० • शुक्रवार दि.२३ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## मनोज जरांगे पाटलांनी दाखवलेली क्लिप ही एआयची नसून भाजपचीच

### रामदास कदम यांचा पत्रकार परिषदेत गंभीर आरोप



मुंबई/प्रतिनिधी-मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी प्रसिद्ध केलेल्या कथित ऑडिओ क्लिपवरून राज्याचे राजकारण तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मनोज जरांगे यांनी सादर केलेल्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये ५०० कोटी रुपयांच्या व्यवहाराचा आणि खा.श्रीकांत शिंदे यांच्या नावाचा उल्लेख असल्याचा दावा करण्यात आला आहे. सदरील क्लिप एआयची नसून भाजपाचीच आहे असा खळबळजनक आरोप माजी मंत्री व शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी पत्रकार परिषदेत बोलतांना केला आहे.

रामदास कदम यांनी घेतलेली पत्रकार परिषद घेत भाजपवरच प्रहार केला आहे. दोन दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर ५०० कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप केला होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांनी पैशांच्या देवाणघेवाणीशी संबंधित एक ऑडिओ क्लिप व्हायरल केली. या ऑडिओ क्लिपला रामदास कदम यांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. एकनाथ शिंदे यांना राजकीयदृष्ट्या संपवण्यासाठी आणि बदनाम करण्यासाठी भाजपने कुणाकडून सुपारी घेतली आहे, असा सवाल रामदास कदम यांनी उपस्थित केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही रामदास कदम यांनी केली आहे. रामदास कदम म्हणाले की, मनोज जरांगे पाटील भाजप नेते प्रसाद लाड यांच्यासोबत जेवण करतात, जरांगे पाटील यांनी प्रसाद लाड यांच्या भेटीचे फोटोही यावेळी रामदास कदम यांनी पत्रकार परिषदेत शेअर केले. त्यामुळे जरांगे पाटील आणि भाजप नेते एकत्र मिळून एकनाथ शिंदेंविरोधात कट रचत असल्याचा दावाही कदम यांनी यावेळी केला. जरांगे-पाटील सर्वांना फसवण्याचा प्रयत्न करत आहेत असा आरोपही रामदास कदम यांनी यावेळी केला. रामदास कदम म्हणाले, जरांगे यांनी व्हायरल केलेली ऑडिओ क्लिप खरी असून जरांगेच्या जवळच्या लोकांनीच मला ती ऑडिओ क्लिप दिली आहे. वेळ आलीच तर मी त्यांचेही नाव उघड करेल, जरांगे पाटील आणि भाजप आता एकत्र येऊन एकनाथ शिंदेंविरोधात षड्यंत्र रचत असल्याचा दावा रामदास कदम यांनी केला आहे. एकनाथ शिंदेंना संपण्यासाठी भाजपने विडा उचलला आहे, पण जरांगेची सगळी बंडखोरी आता समोर येऊ लागली आहे. पण त्याचवेळी जरांगेंनी एकवलेली ऑडिओ क्लिप एआय जनरेटेड नाही, एक दिवस मराठा समाजच तुम्हाला उद् ध्वस्त करेल, असा इशाराही रामदास कदम यांनी दिला आहे.

## अरुणाचल प्रदेशाजवळ भारत-चीन सैनिक आमनेसामने

नवी दिल्ली:अरुणाचल प्रदेशामधील लाइन ऑफ क्चुअल कँट्रोलवर (एलएसी) भारत आणि चीनच्या सैन्यामध्ये पुन्हा एकदा तणाव वाढल्याचे समोर आले आहे. इंडो-तिबेटीयन बॉर्डर पोलीसचे महासंचालक शत्रुजित कपूर यांनी या तणावाची पुष्टी केली आहे. गेल्या काही दिवसांत सीमेवरील अनेक ठिकाणी दोन्ही देशांच्या सैन्यांमध्ये थेट आमनेसामने येण्याच्या घटना घडल्या असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. यावर, माजी लष्करप्रमुख जनरल एम. एम. नरवणे यांनीदेखील मोठे विधान केले आहे.

आयटीबीपीचे महासंचालक शत्रुजीत सिंह कपूर यांनी अरुणाचल प्रदेशमधील सीमावर्ती भागातील सद्यस्थितीबद्दल मोठा खुलासा केला. अरुणाचल प्रदेशमधील विविध भागांमध्ये भारत आणि चीनचे सैनिक आमनेसामने आले आहेत. आमच्या नुकत्याच स्थापन झालेल्या शौर्य कमांडोंनी अशा प्रसंगांमध्ये अत्यंत प्रशंसनीय भूमिका बजावली आहे. आयटीबीपीची मूळ संकल्पना एक माउंटेन गुरिल्ला फोर्स म्हणून करण्यात आली होती. २००४ मध्ये आम्हाला चीनसोबतच्या सीमेच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली. आम्हाला आमच्या मूळ उद्दिष्टापासून दूर जाण्याची गरज नाही असे ते म्हणाले.

## देवेंद्र फडणवीसांना संपवण्यासाठी जरांगेंना ताकद देणारे कोण?

### आ.प्रविण दरेकरांचा थेट शिवसेनेला सवाल

मुंबई/प्रतिनिधी-मनोज जरांगे यांनी समोर आणलेल्या ऑडिओ क्लिपच्या वादात शिवसेना शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी भाजपला खेचले आहे. सदर क्लिप एआय नसून भाजपची आहे, असा दावा त्यांनी केला. तसेच भाजप नेते प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड यांच्या नावाचा उल्लेख करत रामदास कदम यांनी चौकशीची मागणी देखील केली. दरम्यान, रामदास कदम यांच्या आरोपावर आता प्रवीण दरेकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना प्रवीण दरेकर म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी मनोज जरांगे जेव्हा आंदोलन करत होते, तेव्हा आमचं त्यांना समर्थन होतं, आजही समर्थन आहे आणि उद्याही समर्थन राहील. परंतु ज्या वेळेला देवेंद्र फडणवीस यांच्यावर व्यक्तिगत टीका व्हायला लागली, तेव्हा आम्ही रिएक्ट झालो. आम्ही काय लपून छपून रिएक्ट नाही झालो. आम्ही असं म्हणायचं की, पडद्याआड राहून जरांगेला ताकद देणारे आणखी कोण होते? त्याचाही शोध यथावकाश होईल. देवेंद्र फडणवीस यांच्या अंगावर सोडायला, देवेंद्र फडणवीस यांना बदनाम करायला, तेव्हा कोण कोण होतं? कोणी कोणी काय केलंय? हे सुद्धा पुढे येईल, असा इशारा दरेकर यांनी दिला.

## मराठवाडा पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी शांततेत मतदान

नांदेड/प्रतिनिधी-मराठवाडा पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी अत्यंत संथगतीने व शांततेने मतदान सुरु होते. दुपारपर्यंत सरासरी ३६.२ टक्के मतदान झाले असून राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीचे उमेदवार आ.सतीश चव्हाण तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्यात मुख्य लढत होत आहे.

नांदेड जिल्ह्यातील १२० मतदान केंद्रांवर आज (शुक्रवार) सकाळी मतदान प्रक्रियेला प्रारंभ झाला. जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी शहरातील काही मतदान केंद्रांना भेटी देवून प्रत्यक्षरित्या मतदानाची पाहणी केली. मतदार यादीत अनेकांची नावे गायब असल्याने त्यांना मतदानापासून वंचित रहावे लागले आहे. काही मतदारांची नावे इतर ठिकाणी आल्याने त्यांची धावपळ झाली. दुपारी २ वाजेपर्यंत मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील ८८४ मतदान केंद्रांवर १ लाख १७ हजार ६८६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. एकूण ३६.२ टक्के मतदान झाले आहे. मतदान केंद्राबाहेर महायुती व



महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी वेगवेगळे मतदान सहाय्य कक्ष उभारले होते. त्याठिकाणी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची गर्दी होती. खा.रवींद्र चव्हाण, आ.अमरनाथ राजूरकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ.संतुक हंबर्डे, ॲड.किशोर देशमुख, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, शिवसेना (उबाठा) चे जिल्हाप्रमुख **पान ४ वर**




मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नायगाव येथील मतदान केंद्रावर खा.प्रा.रवींद्र चव्हाण व काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

## महापौर कार्यालयासह अमिताभ बच्चन यांचा बंगला बॉम्बने उडवून देण्याची धमकी

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील कायदा सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरून गेल्या काही दिवसांपासून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना घेरले आहे. अशातच आता राज्यात मुंबईत धमक्यांचा सिलसिला पाहायला मिळत आहे. कारण, महापौर रितू तावडे यांचे कार्यालय ते बॉलिवूडचे बिग बी अर्थात अभिनेते अमिताभ बच्चन यांना धमकीचा ई मेल असून यामुळे शहरात खळबळ



उडाली आहे. अभिनेते अमिताभ बच्चन, पंजाबी गायक अभिनेता दिलजीत दोसांझ, मुंबईच्या महापौर रितू तावडेंचे कार्यालय, दादरमधील तीन ते चार शाळांना धमकीचा मेल आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, धमकीच्या ई-मेलमधील मजकूर आणि घातपाताच्या तारखांविषयी मिळालेली धक्कादायक माहिती आहे.

मुंबईतील महापौर कार्यालय, शाळा, सेलिब्रिटींची घरं उडवून देण्याची धमकी आल्यानंतर सुरक्षा यंत्रणा अलर्टम मोडवर आलेल्या आहेत. बॉलिवूडचे बिग बी अमिताभ बच्चन यांचे घर ग्रेनाइडने उडवून देण्याची धमकी दिली आहे. अमिताभ बच्चन यांच्या जलसा बंगल्यावर ३१ ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर दरम्यान हल्ला करू अशी धमकी दिली आहे. त्यासोबतच प्रसिद्ध पंजाबी गायक दिलजीत दोसांझ यालाही धमकी मिळाली आहे. दिलजीत दोसांझ **पान ४ वर**

## होळी भागातील कुंटणखान्यावर पोलीसांची धाड

### पिडित महिलेची पोलीसांनी केली सुटका

नांदेड/प्रतिनिधी-जुन्या नांदेड शहरातील होळी भागात सुरु असलेल्या वेश्या व्यवसायाच्या अड्ड्यावर पोलीसांनी धाड टाकुन एका पिडीत महिलेची सुटका केली. याप्रकरणी वेशा व्यवसाय चालविणाऱ्या महिला व तीच्या मुलास पोलीसांनी अटक केली आहे.

होळी भागातील चंद्रकांत प्लाझा परिसरात वेश्या व्यवसाय सुरु असल्याची माहिती इतवारा उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांना मिळाली. जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले, महिला फौजदार अश्विनी गायकवाड व पोलीस कर्मचाऱ्यांनी गुरुवार दि.२२ ऑक्टोबर रोजी सापळा रचला. पोलीस पथकाने एक बनावट ग्राहक तयार करुन पंचासमोर चंद्रकांत प्लाझा इमारतीत पाठविण्यात आले. ग्राहकाने संबंधीत महिलेशी चर्चा केल्यानंतर पोलीस पथकाला इशारा केला. पोलीसांनी तात्काळ घरावर छापा टाकुन एका महिलेची सुटका केली. वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या दिपाली किशोर उदावंत (वय ५१) व तीचा मुलगा नितीन किशोर उदावंत (वय ३०) या



दोघांना अटक केली. हे दोघे पिडीत महिलेला जास्त पैशाचे आमिष दाखवून तीच्याकडून वैश्या व्यवसाय करवुन घेत होते. पोलीसांनी पंचासमक्ष घराची झडती घेतली असता त्यांना रोख रक्कम, मोबाईल असा ७३ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी दिपाली किशोर उदावंत व नितीन किशोर उदावंत यांच्या विरोधात इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पोलेवाडी शिवारात वाटमारी; वाहनचालकास लुटले

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड ते अहमदपूर रोडवरील पोलेवाडी शिवारात बुधवारी रात्री चोरट्यांनी वाहन अडवून लुटल्याची घटना घडली आहे.

कोपरा ता.अहमदपूर येथील दिलीप मरीबा आचार्य (वय ४८) हे बुधवारी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास वाहनाने जात असतांना पोलेवाडी शिवारात अज्ञात चार चोरट्यांनी त्यांचे वाहन थांबविले. दिलीप आचार्य यांना शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. आचार्य यांच्या जवळील रोख रक्कम व सोन्याचे दागिणे असा ६९ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी हिसकावून घेतला. तसेच चोरट्यांनी महामार्गावरील इतर वाहनांना अडवून प्रवेशांना लुटण्याचा प्रयत्न केला. दिलीप आचार्य यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन लोहा पोलीस ठाण्यात अज्ञात चार चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाटमारीच्या घटनेमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री पठाण हे करीत आहेत.

# पाचशे कोटींचा आरोप;सत्य काय?

**महाराष्ट्राच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू असतानाच मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत केलेल्या ५०० कोटी रुपयांच्या आरोपाने नव्या चर्चेला तोंड फोडले आहे. दसरा मेळाव्यात जरांगे यांनी खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून आपल्या नावाने ५०० कोटी रुपये घेतल्याचा दावा केला. त्यानंतर या प्रकरणाशी संबंधित ऑडिओ क्लिपचा मुद्दाही चर्चेत आला. या आरोपामुळे राजकीय वातावरण तापले असले, तरी आरोप आणि सिद्ध झालेली वस्तुस्थिती यांतील अंतर लक्षात घेणे आवश्यक आहे. ५०० कोटींच्या कथित व्यवहाराचे सत्य काय, हा या प्रकरणातील मुख्य प्रश्न आहे. आरोप नेमका कोणत्या व्यवहारासंदर्भात आहे, संबंधित रक्कम प्रत्यक्षात कोणाकडून घेतली गेली का, त्यामागे कोणाचा सहभाग होता आणि या दाव्याला कोणते पुरावे आहेत, याची उत्तरे अद्याप तपासातूनच स्पष्ट होऊ शकतात. केवळ आरोपाच्या आधारे कोणालाही दोषी ठरवता येत नाही. त्याचप्रमाणे, आरोप राजकीय स्वरूपाचा आहे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणेही योग्य ठरणार नाही. या प्रकरणात ऑडिओ क्लिपचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. मात्र, ध्वनिमुद्रण चर्चेत येणे आणि त्यातील मजकूर सत्य असल्याचे सिद्ध होणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. संबंधित क्लिपची सत्यता, संभाषणातील व्यक्तींची ओळख, त्याचा संपूर्ण संदर्भ आणि आवश्यक असल्यास आर्थिक व्यवहारांच्या नोंदींची तपासणी होणे गरजेचे आहे. क्लिपमधील संभाषणाचा एखादा भाग समोर आल्यास त्यावरून संपूर्ण प्रकरणाचा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल.या प्रकरणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याबाबत करण्यात आलेल्या दाव्यांची सत्यता तपासणे आवश्यक आहे. संबंधित व्यक्तींची भूमिका, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती आणि आरोपांच्या समर्थनार्थ सादर होणारे पुरावे यांचा विचार निष्पक्षपणे झाला पाहिजे. आरोपांबाबत संबंधितांची अधिकृत भूमिका आणि तपास यंत्रणांकडून मिळणारी माहितीही महत्त्वाची आहे. राजकीय विधानांवरून अंतिम निष्कर्ष काढण्याऐवजी सर्व बाजूंची पडताळणी होणे आवश्यक आहे. या प्रकरणाची चौकशी झालीच पाहिजे, अशी मागणी होत असल्यास त्याकडे राजकीय संघर्षाच्या दृष्टिकोनातून पाहण्याऐवजी कायदेशीर प्रक्रियेच्या दृष्टीने पाहणे उचित ठरेल. चौकशी निष्पक्ष असावी, तिच्यावर कोणताही राजकीय दबाव नसावा आणि निष्कर्ष उपलब्ध पुराव्यांवर आधारित असावेत. आरोप सिद्ध झाल्यास कायद्यानुसार कारवाई व्हावी; आरोपांना आधार नसल्याचे स्पष्ट झाल्यास संबंधितांवरील संशयही दूर झाला पाहिजे. न्यायप्रक्रियेत या दोन्ही शक्यतांना समान महत्त्व आहे. महाराष्ट्रातील राजकारणात एखादा आरोप समोर आल्यानंतर त्यावरून राजकीय ध्रुवीकरण होण्याची शक्यता असते. समर्थक आरोपांना सत्य मानतात, तर विरोधक त्यामागे राजकीय हेतू असल्याचे सांगतात. मात्र, अशा प्रतिक्रिया सत्याचा पर्याय होऊ शकत नाहीत. आरोप करणाऱ्यांनी उपलब्ध पुरावे सक्षम यंत्रणांसमोर मांडावेत आणि ज्यांच्यावर आरोप झाले आहेत, त्यांनाही आपली बाजू मांडण्याची संधी मिळाली पाहिजे. त्यानंतर तपासातून समोर येणाऱ्या तथ्यांच्या आधारेच निष्कर्ष काढणे योग्य ठरेल.या प्रकरणाची चर्चा सुरू असताना जनतेच्या इतर प्रश्नांकडेही दुर्लक्ष होता कामा नये. बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांची परिस्थिती आणि आरक्षणासारख्या विषयांवर शासनाकडून निर्णयांची अपेक्षा आहे. राजकीय आरोपांमुळे या प्रश्नांची जागा घेतली जाऊ नये. उलट, सार्वजनिक जीवनातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी अशा प्रकरणांची कायदेशीर चौकशी महत्त्वाची ठरते. ५०० कोटी रुपयांच्या आरोपामागील वस्तुस्थिती काय आहे, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. मात्र, त्यासाठी राजकीय दावे नव्हे, तर विश्वसनीय पुरावे आणि निष्पक्ष तपास हाच मार्ग आहे. आरोपांना प्रसिद्धी मिळाली म्हणून ते सिद्ध होत नाहीत आणि आरोप राजकीय वादातून झाले म्हणून ते आपोआप खोटेही ठरत नाहीत.या प्रकरणात अंतिम निर्णय भावनेने नव्हे, तर पुराव्यांनी व्हायला हवा. सत्य जे काही असेल, ते कोणाच्याही राजकीय सोयीचा विचार न करता जनतेसमोर आले पाहिजे. हाच निष्पक्षतेचा आणि लोकशाहीतील उत्तरदायित्वाचा खरा कस आहे.**

# मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे: आरोपांतील तथ्य की मिथ्य?

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात मराठा आरक्षणाचा प्रश्न गेल्या काही वर्षांपासून केंद्रस्थानी आहे. या प्रश्नाला व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप देण्यात मनोज जरांगे-पाटील यांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. उपोषण, मोर्चे, जनसंवाद आणि शासनाशी संघर्ष या माध्यमांतून त्यांनी मराठा आरक्षणाचा मुद्दा राज्याच्या राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणला. त्यांच्या आंदोलनाला लाखो लोकांचा पाठिंबा मिळाला; त्याचबरोबर त्यांच्या कार्यपद्धतीवर, भूमिकेवर आणि सहकाऱ्यांवरही विविध आरोप झाले. त्यामुळे आज प्रश्न केवळ एका व्यक्तीच्या समर्थनाचा किंवा विरोधाचा नाही, तर आरोपांची सत्यता, सार्वजनिक जीवनातील पारदर्शकता आणि सामाजिक चळवळींच्या विश्वासार्हतेचा आहे.

ऑक्टोबर २०२६ मध्ये मनोज जरांगे-पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संबंधित ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहाराचा आरोप केला. हा पैसा आपल्याला गप्प करण्यासाठी देण्याची चर्चा झाल्याचा दावा त्यांनी केला. त्यानंतर त्यांनी कथित संभाषणाची ध्वनिमुद्रिका पत्रकार परिषदेत ऐकवून चौकशीची मागणी केली. मात्र, इंडियन एक्स्प्रेसने या ध्वनिमुद्रिकेची सत्यता स्वतंत्रपणे पडताळलेली नसल्याचे स्पष्ट केले आहे. एकनाथ शिंदे यांनीही असा कोणताही पैसा दिला किंवा घेतला नसल्याचे सांगून आरोप फेटाळले.त्यामुळे या प्रकरणातील सत्य समोर आणण्यासाठी ध्वनिमुद्रिकेची तांत्रिक तपासणी आणि निष्पक्ष चौकशी आवश्यक आहे. केवळ आरोप किंवा प्रत्यारोप यांवरून अंतिम निष्कर्ष काढता येत नाही. (स्रोत : इंडियन एक्स्प्रेस, २१ व २२ ऑक्टोबर २०२६.)

दुसरीकडे, मनोज जरांगे-पाटील आणि त्यांच्या काही निकटवर्तीयांच्या आर्थिक व्यवहारांबाबतही आरोप करण्यात आले आहेत. माजी सहकारी अजय बारसकर यांनी कथित आर्थिक अनियमितता, मालमत्ता आणि वाळूउपशाशी संबंधित बाबींची चौकशी करण्याची मागणी केल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे.सप्टेंबर २०२६ मधील वृत्तांनुसार, या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित यंत्रणांकडून प्राथमिक स्वरूपात आर्थिक व्यवहारांची प्राथमिक चौकशी, तक्रार आणि न्यायालयात सिद्ध झालेला गुन्हा या तीन वेगवेगळ्या बाबी आहेत.म्हणूनच, या प्रकरणात दोन प्रश्न उपस्थित होतात. आरोप करणाऱ्यांनी सादर केलेले पुरावे कितपत विश्वसनीय आहेत? आणि आरोपांचा सामना करणाऱ्यांनी आवश्यक ती माहिती तपास यंत्रणांसमोर मांडून पारदर्शकतेची भूमिका घेतली आहे का? या प्रश्नांची उत्तरे कागदपत्रे, आर्थिक नोंदी आणि अधिकृत तपासातूनच मिळू शकतात.सरकार विरोधी समाजाची भूमिका घेवून संघर्ष करणाऱ्यावर असे आरोप होतचं असतात.

मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाच्या पद्धतीवरही राजकीय नेत्यांनी आणि आंदोलनातील काही व्यक्तींनी आकशापोटी टीका केली आहे. उपोषणामागील हेतू, त्यातून साध्य झालेली उद्दिष्टे आणि शासनाशी झालेल्या चर्चांचे परिणाम याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र, उपोषणादरम्यान ते अन्न घेत होते किंवा आंदोलनाचा वापर



वैयक्तिक स्वार्थासाठी केला, अशा स्वरूपाचे दावे स्वतंत्र पुराव्यांशिवाय सत्य मानता येणार नाहीत.असे आरोप,प्रत्यारोप होतच असतात.लोकशाहीत कोणत्याही आंदोलनकर्त्याला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे; त्याचप्रमाणे आरोपांना पुराव्यांच्या आधारे उत्तर देण्याची अपेक्षाही रास्त आहे.आंदोलनाचे समर्थन करणाऱ्यांनी प्रत्येक आरोपाला राजकीय कट म्हणणे आणि विरोधकांनी प्रत्येक आरोपाला सिद्ध झालेला गुन्हा मानणे, या दोन्ही भूमिका विवेकाला धरून नाहीत.

**पंडित पवळे**
नांदेड

मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाचे मूल्यमापन करताना मराठा आरक्षणाच्या मूळ प्रश्नाकडे दुर्लक्ष होता कामा नये. शिक्षण, रोजगार, आर्थिक असुरक्षितता आणि ग्रामीण भागातील बदलती सामाजिक परिस्थिती यांमुळे आरक्षणाची मागणी अनेक मराठा कुटुंबांसाठी महत्त्वाची ठरली आहे. या अस्वस्थतेला संघटित आवाज देण्यात जरांगे यांच्या आंदोलनाचे योगदान आहे.परंतु कोणत्याही समाजाच्या प्रश्नाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीला प्रश्न विचारण्यापलीकडे ठेवता येत नाही. आंदोलनातून शासनावर दबाव निर्माण करणे जितके महत्त्वाचे, तितकेच मिळालेल्या आश्वासनांचा पाठपुरावा करणे, कायदेशीर तरतुदी समजून घेणे आणि समाजाला वस्तुस्थिती सांगणेही महत्त्वाचे आहे.आरक्षणाचा प्रश्न हा भावनेइतकाच संविधानिक आणि कायदेशीर प्रक्रियेचाही विषय आहे. त्यामुळे घोषणांपेक्षा टिकाऊ कायदेशीर उपाय, पारदर्शक धोरण आणि प्रत्यक्ष लाभ मिळवून देणारी व्यवस्था यांना प्राधान्य दिले पाहिजे.

### माध्यमे, समाज आणि सत्याची जबाबदारी

आज समाजमाध्यमांमुळे एखादा आरोप काही मिनिटांत राज्यभर पोहोचतो; मात्र त्याची सत्यता तपासण्यासाठी लागणारा वेळ आणि संयम अनेकदा दाखवला जात नाही. संपादित ध्वनिमुद्रिका, अपूर्ण कागदपत्रे, राजकीय भाषणे आणि एकतर्फी दावे यांच्या आधारे व्यक्तीची प्रतिमा तयार होऊ शकते किंवा उद्ध्वस्तही होऊ शकते.म्हणून पत्रकारितेने आरोप आणि सिद्ध तथ्य यांत स्पष्ट फरक केला पाहिजे. तक्रार दाखल झाली असेल तर ती तक्रार आहे, चौकशी सुरू असेल तर ती चौकशी आहे आणि न्यायालयाने दोष सिद्ध केला असेल तरच त्या निष्कर्षाला तसा आधार आहे. हीच लोकशाहीतील जबाबदार पत्रकारितेची कसोटी आहे.समाजानेही व्यक्तिपूजा आणि व्यक्तिद्वेष या दोन्ही टोकांपासून दूर राहिले पाहिजे. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला आजतागायत अभुतपुर्व पाठिंबा मिळालेला आहे.अशा एखाद्या नेत्यावर आरोप झाले म्हणून त्याच्या संपूर्ण सामाजिक कार्याला नाकारता येत नाही.

### ना अंधसमर्थन, ना पुराव्याविना दोषारोप!

मनोज जरांगे-पाटील यांच्यावरील आरोपांबाबत अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी स्वतंत्र, निष्पक्ष आणि पुराव्यांवर आधारित चौकशी आवश्यक आहे. आरोप करणाऱ्यांनी आपल्याकडील पुरावे सक्षम यंत्रणांसमोर सादर करावेत आणि संबंधितांनीही चौकशीला सामोरे जाऊन सत्य स्पष्ट करण्याची भूमिका घ्यावी.दोष सिद्ध झाल्यास कायद्यानुसार कारवाई व्हावी; आरोप निराधार ठरल्यास संबंधितांची प्रतिष्ठा पुनर्स्थापित झाली पाहिजे.मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचे मूल्यमापन करताना नेतृत्वाचे योगदान, आंदोलनाचे परिणाम आणि नेतृत्वावरील आरोप या तिन्ही बाबींचा स्वतंत्रपणे विचार केला पाहिजे. कारण कोणतीही सामाजिक चळवळ एका व्यक्तीपुरती मर्यादित नसते; ती समाजाच्या आशा, आकांक्षा आणि भविष्याशी जोडलेली असते.

अखेर प्रश्न मनोज जरांगे-पाटील यांना पाठिंबा देण्याचा किंवा विरोध करण्याचा नाही; प्रश्न आहे सत्याच्या बाजूने उभे राहण्याचा! आरोप खरे असतील तर पुरावे पुढे आले पाहिजेत, खोटे असतील तर तेही स्पष्ट झाले पाहिजेत.कारण लोकशाहीत व्यक्तीपेक्षा सत्य मोठे, राजकारणापेक्षा समाजहित मोठे आणि कोणत्याही नेत्यापेक्षा कायदा मोठा असतो.

# नर्सिंग प्रशिक्षणार्थींच्या भरवशावर माहूरच्या ग्रामीण रुग्णालयाचा कारभार

## आरोग्य मंत्र्यांच्या सूचनांना जिल्हा शल्यचिकित्सकांची केराची टोपली; रिक्त पदांमुळे रुग्णांचे हाल

माहूर/प्रतिनिधी-गोरगरिबांना दर्जेदार आणि तत्काळ आरोग्यसेवा देण्याच्या घोषणा करणाऱ्या शासनाच्या आरोग्य यंत्रणेची माहूरमध्येच दयनीय अवस्था झाली आहे.३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांसह अधिपरिचारिका आणि अन्य कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने रुग्णसेवेचा अक्षरशः बोजवारा उडाला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, रुग्णालयातील मनुष्यबळाची कमतरता भरून काढण्यासाठी नर्सिंगच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या साहाय्याने रुग्णावार उपचार होतं असल्याचे चित्र आहे. लस देणे, सलाईन लावणे यासारख्या रुग्णसेवेशी संबंधित कामांमध्ये प्रशिक्षणार्थींचा सहभाग असल्याने रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

रिक्त पदांवर तात्पुरती पर्यायी व्यवस्था करण्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या सूचनांनंतरही कार्यवाही झाली नसल्याचा आरोप होत असल्याने जिल्हा शल्यचिकित्सकांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.माहूरच्या ग्रामीण रुग्णालयात दररोज सुमारे साडेतीनशेहून अधिक रुग्ण उपचारासाठी येतात. माहूरसह सारखणी, वाई बाजार, वानोळा, कुपटी आणि दुर्गम ग्रामीण भागातील नागरिकांसाठी हे रुग्णालय आरोग्यसेवेचा महत्त्वाचा आधार आहे. मात्र, रुग्णांची संख्या मोठी आणि कर्मचारी अपुरे, अशी विसंगत परिस्थिती निर्माण झाली आहे. उपलब्ध डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असून, त्याचा फटका थेट रुग्णांना बसत आहे. तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याचे कारण देत रुग्णांना खासगी रुग्णालये किंवा यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला जात असल्याच्या तक्रारी आहेत. परिणामी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना प्रवासाचा खर्च, उपचारांचा खर्च आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. सरकारी रुग्णालयात उपचार मिळण्याची अपेक्षा घेऊन आलेल्या नागरिकांना अखेर खासगी रुग्णालयांचा दरवाजा ठोठावण्याची वेळ येत असेल, तर शासनाच्या मोफत आणि सुलभ आरोग्यसेवेच्या घोषणांचा उपयोग काय? या गंभीर परिस्थितीबाबत नगराध्यक्ष फिरोज हाजी कादर दोसानी यांनी आरोग्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्याकडे निवेदन देऊन रिक्त पदांचा प्रश्न मांडला होता. त्याची दखल घेत मंत्री बोर्डीकर यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांना




तातडीने, तात्पुरत्या स्वरूपात का होईना, पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्याचे सांगण्यात येते. मात्र, त्यानंतरही अपेक्षित व्यवस्था झाली नसल्याचा आरोप होत आहे. मंत्र्यांच्या सूचनांची अंमलबजावणी होत नसेल, तर त्याची जबाबदारी कोणाची? जिल्हा शल्यचिकित्सकांना या ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांचे हाल दिसत नाहीत का? की दुर्गम भागातील रुग्णांच्या आरोग्याला प्रशासनाच्या लेखी काहीच महत्त्व नाही? असे संतप्त सवाल उपस्थित होत आहेत. रिक्त पदांचा डोंगर वाढत असताना प्रशासनाचे दुर्लक्ष आणि रुग्णांची होणारी परवड यामुळे माहूरच्या आरोग्य व्यवस्थेची विश्वासार्हताच धोक्यात आली आहे. प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या मदतीवर रुग्णालयाचा कारभार चालविणे हा कायमस्वरूपी उपाय होऊ शकत नाही. प्रशिक्षणार्थींना त्यांच्या प्रशिक्षणाच्या मर्यादेत आणि पात्र कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखालीच काम करण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. त्यामुळे अधिपरिचारिकांसह डॉक्टर आणि इतर रिक्त पदे तातडीने भरावीत, तोपर्यंत पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करावे आणि आरोग्यमंत्र्यांच्या सूचनांची अंमलबजावणी झाली की नाही, याची वरिष्ठ स्तरावर चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

# कृष्णा उमरीकर यांना राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार जाहीर

## शिर्डी येथे ३ नोव्हेंबर रोजी पुरस्कार वितरण सोहळा

नांदेड/प्रतिनिधी-माऊली हेल्प फाउंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय सन्मान पुरस्कार २०२६ जाहीर झाले असून नांदेड येथील ज्येष्ठ पत्रकार कृष्णा दामोदरराव उमरीकर यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या सन्मानासाठी या सोहळ्याचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष सुरेश मुळे यांनी दिली आहे.

माऊली बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि माऊली हेल्प फाउंडेशन यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता शिर्डी येथील हॉटेल शांति कमल, मनमाड रोड, लुंगो इन येथे आयोजित करण्यात आला



आहे.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. विवेक कोल्हे, नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्षा प्रियंकाताई दामले (बदलापूर), नीताताई केळकर (जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या (सांगली), मंजुषाताई कुलकर्णी (प्रशासकीय अधिकारी मुख्यमंत्री कार्यालय), पद्मश्री ताई धर्माधिकारी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाला कॅबिनेट मंत्री आशीष दामले हे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार असून, पं. अनंत शास्त्री भगरे गुरुजी यांचे शुभाशीर्वाद लाभणार आहेत.कृष्णा उमरीकर हे नांदेड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार असून, ते गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी दैनिक सत्यप्रभा, दैनिक श्रमिक एकजूट, दैनिक लोकपत्र, दैनिक देशोन्नती, दैनिक एकमत आणि दैनिक वृत्त केसरी या वृत्तपत्रांमध्ये संपादकीय विभागात विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. सध्या ते दैनिक पुण्य नगरी, नांदेड येथे पूर्णवेळ पत्रकार म्हणून कार्यरत आहेत. पत्रकारितेबरोबरच सामाजिक कार्यातही त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. त्यांनी आतापर्यंत ५० वेळा रक्तदान केले असून, नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयातर्फे रक्तदानासाठी त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. विद्यार्थी आंदोलनात सक्रिय सहभाग घेत त्यांनी शैक्षणिक समस्यांसाठी संघर्ष केला. तसेच नांदेड आणि मराठवाड्यातील रेल्वे विस्तार व विकासाच्या आंदोलनातही त्यांनी अनेकदा सहभाग घेतला आहे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत नांदेड शहर सहमंत्री, मंत्री आणि महाराष्ट्र प्रदेश सहमंत्री म्हणून त्यांनी काम केले आहे. सध्या ते विविध सामाजिक व पत्रकार संघटनांमध्ये पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या पत्रकारिता आणि सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना कॉ. अनंतराव नागापूरकर स्मृती राज्य उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार, तुफानातील दिवे पत्रकारिता पुरस्कार, सत्यशोधक पत्रकारिता पुरस्कार, फुले-आंबेडकरी विचारधारा राज्य पत्रकारिता पुरस्कार, कोरोना योद्धा पुरस्कार आणि डॉ. शंकरराव चव्हाण विकास पत्रकारिता पुरस्कार यांसह अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.कृष्णा उमरीकर यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांच्या पत्रकारिता आणि सामाजिक कार्याची दखल घेतली जात असल्याची भावना व्यक्त होत आहे. या पुरस्कारा-बद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन केले जात आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# किनवट बाजार समितीच्या सभापती विरुद्ध अविश्वास ठराव मंजूर

## भाजपाच्या संचालकांनी भाजपाच्याच सभापतीला पदच्युत केल्याने खळबळ



किनवट/प्रतिनिधी- बहूचर्चीत झालेल्या किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती विरुद्धच्या अविश्वास प्रस्ताव बहूमत चाचणी प्रक्रिया प्रकरणी २२ ऑक्टोबर रोजी बोलावलेल्या विशेष सभेत अविश्वास ठरावाच्या बाजूने १७ संचालकांच स्पष्ट बहूमत तर दुसऱ्या बाजूने सभापतींचे एकट्याचे १ मत असे मतदान प्रक्रियेतून चित्र समोर आले. भाजपाच्या संचालकांनी भाजपाच्या सभापतीवरुद्ध दंड थोपटून पदच्युत केल्यामुळे तर्कवितर्क ऐकायला मिळताहेत.

प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार डॉ.शारदा चौंडेकर आणि त्यांचे सहकारी नायब तहसीलदार बालाजी फोले, दिलीप भुरे यांनी विशेष सभेचे कामकाज पाहिले.

आता सभापतीपद रिक्त झाले असून पुढील प्रक्रियेपर्यंत प्रशासक म्हणून सहाय्यक निबंधक यांच्याकडे बाजार समितीचा कार्यभार जाऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयात सभापतींनी दाखल केलेल्या विशेष याचिकेकडे लोकांचे लक्ष लागून दिसते. सहाय्यक निबंधक गायकवाड यांनी सभेचे इतिवृत्त वाचून, सभेअंती इतिवृत्त त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. २५ मे रोजी चौदा संचालकांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नांदेड यांच्याकडे सभापती गजानन मुंडे विरुद्ध अविश्वास प्रस्ताव सादर केला होता. त्यावरुन १० ऑक्टोबर विशेष सभा देखील आयोजित केली होती. परंतु सभापतींनी त्याला आव्हान म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात रिट याचिका दाखल केल्याने त्या प्रक्रियेला ब्रेक लागले होते. ९ ऑक्टोबर रोजी याच न्यायालयाने सभापतींचे आव्हान फेटाळत विशेष सभेला ग्रीन सिग्नल दिले. २२ ऑक्टोबर रोजी बहूमत चाचणीची विशेष सभा बोलावण्यासाठी डॉ.शारदा चोंडेकर यांनी सभापतींसह सर्व संचालकांना १२ ऑक्टोबर रोजी नोटीसा बजावल्या होत्या. दरम्यान सभापतींनी २० ऑक्टोबर रोजीच सभापतींनी त्यालासुद्धा आव्हान देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका दाखल केलीय आणि स्विकारली देखील. अशा वेळी ठरलेल्या तिथीदिनांकालाच अविश्वास प्रस्तावावर बहूमत चाचणी प्रक्रिया पार पडली आणि १७ विरुद्ध १ असे संख्याबळ समोर आल्याने तुर्तास तरी सभापतींची खुर्ची रिकामी झाली असली तरी पुन्हा काही उटकपटक होईल का ? यावर उलटसुलट चर्चांना उधाण आल्याचे दिसते. २२ ऑक्टोबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात पार पडलेल्या अविश्वास प्रस्ताव बहूमत चाचणी विशेष सभेत संचालक राहुल नाईक, अनिल कराळे, सोपानराव केंद्रे, श्रीराम कांदे, सुनील घुगे, कैलाश बिजमवार, प्रेमसिंग साबळे, प्रेम जाधव, बालाजी बामणे, शेख हैदर शेख मुसा, राजू सुरोशे, प्रल्हाद सातव, नविन राठोड, अब्दुल सत्तार, सौ. विद्या दासरवार, सौ. अनुसया पेंदोर, श्रीमती कुसुम गणपत मुंडे या सतरा संचालकांनी सभापती विरुद्ध शिक्कामोर्तब केलाय, हे उल्लेखनीय म्हणता येईल.

## मटका अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-देगलूर नाका भागात सुरु असलेल्या मटका अड्डयावर गुरुवारी रात्री इतवारा पोलीसांनी धाड टाकुन एका जणास अटक केली आहे.

देगलूर नाका भागात मटका अड्डा सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीसाच्या एका पथकाने गुरुवारी रात्री मटका अड्डयावर धाड टाकली. याप्रकरणी मो. फारुक अब्दुल खयुम (वय ३०) रा.लक्ष्मीनगर, नांदेड यास अटक केली आहे. जगदीश बिजुलाल भाटेलाल हा फरार झाला आहे. पोलीसांनी एक मोबाईल, मटका घेण्याचे साहित्य, रोख रक्कम असा २२ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मराठवाडा पदवीधर विधान परिषद निवडणुकीतील कंधार येथील मतदान केंद्रावर तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी भेट देवून व्यवस्थेची पाहणी केली. तसेच मतदानाचा पहिला हक्क बजावणाऱ्या महेंद्र कांबळे यांचे स्वागत केले आहे.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या तरुणास अटक

नांदेड/प्रतिनिधी- अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या तरुणास भाग्यनगर पोलीसांनी तात्काळ अटक करुन त्याच्या विरोधात २४ तासामध्ये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत.



भाग्यनगर पोलीस स्टेशन हद्दीत राहणारी एक अल्पवयीन मुलगी व तीचा भाऊ शाळेतून घरी परत जात असतांना दि.२१ ऑक्टोबर रोजी सकाळी नंदकिशोर लक्ष्मण पंढरे (वय २०) रा.संभाजीनगर,कंधार याने त्यांना अडविले. मला तु आवडतेस असे म्हणून विनयभंग केला. याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पोलीसांनी त्वरित नंदकिशोर लक्ष्मण पंढरे यास अटक केली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वैंजने, भाग्यनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार साहेबराव कसबेवाड यांनी तपास करुन तांत्रिक पुरावे व कागदपत्राची पुर्तता करुन चोवीस तासात नंदकिशोर लक्ष्मण पंढरे याच्या विरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

## वादग्रस्त धार्मिक स्थळाच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

नांदेड/प्रतिनिधी- महानुभाव पंथीय व मुस्लिम समाजामध्ये वाद निर्माण झालेल्या नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे ब्रह्मपुरी येथील वादग्रस्त धार्मिक स्थळाच्या परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे. दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपासून दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत हा आदेश लागू राहणार आहे.

मौजे ब्रह्मपुरी येथील गट क्रमांक ४४/१ व ४४/२ जवळील गोदावरी नदीच्या पात्रालगत असलेल्या खडकाच्या दगडांच्या जागेवर पूजा-अर्चा करण्यावरून दोन्ही समाजांमध्ये वाद निर्माण झाला आहे. सदर जागेबाबत दोन्ही समाजांकडून वेगवेगळे दावे करण्यात आले असून, यापूर्वीही या ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांच्या वेळी तणावाची परिस्थिती निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. आगामी काळात महानुभाव पंथाचे विविध धार्मिक सण व उत्सव असून, या कालावधीत मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित ठिकाणी गर्दी होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून हा आदेश जारी करण्यात आला आहे.

## संयुक्त राष्ट्रसंघदिनी संयुक्त राष्ट्रसंघाचा ध्वज राष्ट्रध्वजा समवेत उभारावा

नांदेड/प्रतिनिधी-संयुक्त राष्ट्रसंघ दिन २४ ऑक्टोबर रोजी आहे. या दिवशी संयुक्त राष्ट्रसंघाचा ध्वज राष्ट्र ध्वजा समवेत उभारण्या-बाबत शासन परिपत्रकानुसार निर्देश दिले आहेत.

ज्या शासकीय कार्यालयात दररोज राष्ट्रध्वज उभारण्यात येतो त्या कार्यालयावर २४ ऑक्टोबर २०२६ या संयुक्त राष्ट्रसंघदिनी संयुक्त राष्ट्रसंघाचा ध्वज भारतीय ध्वजसंहिता २००२ च्या परि. ३.३६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रध्वजाच्या बरोबर उभारण्यात यावा. संयुक्त राष्ट्रसंघाचा ध्वज राष्ट्रध्वजाच्या कोणत्याही बाजुला फडकविता येतो. सामान्यत: ध्वज स्तंभाच्यासमोर उभ्या असलेल्या प्रेक्षकांच्यादृष्टीने त्यांच्या अगदी डावीकडे राष्ट्रध्वज असावा असे निवासी उपजिल्हाधिकारी नांदेड यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## सावरगाव माळ येथे पशुधनाच्या पाणीटंचाईची अधिकाऱ्यांकडून पाहणी

नांदेड/प्रतिनिधी-भोकर तालुक्यातील सावरगाव माळ येथे पशुधनासाठी निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नुकतीच प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी पशुधनाला पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध करून देणे आणि टंचाई निवारणासाठी आवश्यक उपाययोजना करण्या-बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या पाहणीवेळी जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. सखाराम खुणे, पंचायत समिती भोकरचे गटविकास अधिकारी शेखर देशमुख, भोकरचे नायब तहसीलदार आणि पशुधन विकास अधिकारी डॉ. अविनाश बुन्नावार उपस्थित होते. या पाहणीदरम्यान पशुधनासाठी पिण्याच्या पाण्याची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करणे, पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर तातडीच्या उपाययोजना राबविणे तसेच भविष्यातील पाणीटंचाईचे निवारण करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत चर्चा करण्यात आली. यासाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वयातून आवश्यक कार्यवाही करावी, असे मार्गदर्शन करण्यात आले. पशुधनाचे संरक्षण आणि त्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देऊन पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

## बालसाहित्य म्हणजे आनंदी आयुष्याची पायाभरणी-डॉ.सुरेश सावंत

नांदेड/प्रतिनिधी-सोपे लिहिणे ही अतिशय अवघड गोष्ट असते. बालसाहित्य म्हणजे घडीभराची करमणूक नसून बालकांच्या आनंदी आयुष्याची पायाभरणी असते, असे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांनी केले.

बालाजी भागानगरे लिखित गाऊ मजेत गाणे ह्या मिहाना पब्लिकेशन पुणे यांनी प्रकाशनासाठी सिद्ध केलेल्या बालकवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा डॉ. सुरेश सावंत आणि केंब्रिज हायस्कूलच्या प्राचार्या श्रीमती रेवती गव्हाणे यांच्या हस्ते सायन्स कॉलेज येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे हे होते. डॉ. सुरेश सावंत पुढे म्हणाले, की बालकविता म्हणजे निरागस, निखळ, निर्मळ आणि निष्पाप मनाने बालकुमारांशी साधलेला संवाद असतो. बालाजी भागानगरे यांना हा संवाद छान जमला आहे. बालसाहित्य लिहिताना मनोरंजन, ज्ञान आणि मूल्यसंस्कार या गोष्टींचा ताल आणि तोल सांभाळता आला पाहिजे. बालाजी भागानगरे यांची बालकविता आनंददायी जगण्याचा मूलमंत्र देते. भागानगरे यांचा गाऊ मजेत गाणे हा बालकवितासंग्रह इतका छान झाला आहे की, यात त्यांनी शब्दचमत्कृती आणि अर्थसमृद्धी यांचा सुंदर मेळ साधला आहे. अध्यक्षीय भाषणात डॉ. लक्ष्मण शिंदे यांनी गाऊ मजेत गाणे या बालकवितासंग्रहातील काही ओळी वाचून दाखवल्या आणि बालाजी भागानगरे यांना पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या.

## समर्पण भावनेतून कार्य केल्यास खरा आनंद प्राप्त होतो-नेम्माणीवार

किनवट/प्रतिनिधी-आपले कार्य समर्पण भावनेतून केल्यास खरा आनंद प्राप्त होतो, यासाठी सर्वांनी आपले कार्य प्रामाणिकपणे करावे, असे आवाहन सरस्वती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव नेम्माणीवार यांनी केले.

सरस्वती विद्या मंदिर कला महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी मधुकर ताडपेलीवार यांच्या सेवापुर्ती कार्यक्रमात ते बोलत होते. मंचावर संस्थेचे सचिव मुख्याध्यापक कृष्णकुमार नेमानीवार, उपाध्यक्ष आदिवरद नेम्माणीवार, मधुकर व सौ. मनोरमा ताडपेल्लीवर व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ.मार्तंड कुलकर्णी, माजी प्राचार्य डॉ. आनंद भंडारे उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा.डॉ. रामकिसन चाटे यांनी केले. सरस्वती शिक्षण संस्था व महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी माध्यमिक उच्च माध्यमिक विभागाच्या वतीने ताडपेलीवार कुटुंबांचा सत्कार केला. ग्रंथपाल माधव नेमानीवार, सेवानिवृत्त अधीक्षक व्यंकट सातुरवार, डॉ.सुनील व्यवहारे व माजी प्राचार्य तथा मराठी विभाग प्रमुख डॉ.भंडारे यांनी मनोगत व्यक्त केले. मधुकर ताडपेलीवार यांनी सत्काराला उत्तर देताना




माझ्यासाठी सरस्वती शिक्षण संस्था महत्त्वाची असून त्यांचा कायम मी ऋणी असेल. प्रभारी प्राचार्य डॉ.कुलकर्णी यांनी मधुकर ताडपेलीवार यांच्या कार्याविषयी बोलताना शिस्त संस्कार व वेळेचे नियोजन किती महत्त्वाचे होते यावर भर दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.किरण आयनेनिवार यांनी केले तर आभार समाजशास्त्र विषयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ.मनोहर थोरात यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.विवेक चनमनवार डॉ.अजय किटे, डॉ.अण्णासाहेब सोळंके, गोविंद ताडपेलीवार, श्रीमती वैशाली बेंजेंकीवार, श्रीमती करुणा नेम्माणीवार आदींनी सहकार्य केले.

## भोकर तालुक्यात दुर्गा विसर्जन शांततेत

नांदेड/प्रतिनिधी-मागील १० दिवसापासून चालू असलेल्या नवरात्र उत्सवानिमित्त स्थापन करण्यात आलेल्या दुर्गा मूर्तीचे विसर्जन २१ ऑक्टोबर रोजी शांततामय व उत्साह पूर्ण वातावरणात करण्यात आले. भोकर शहरातील ४० तर ग्रामीण भागातील १४ दुर्गा मूर्तीचे विसर्जन पार पडले. २१ ऑक्टोबर रोजी शहरातील ४० तर ग्रामीण भागातील ९५ दुर्गा मूर्तीचे विसर्जन शांततामय व उत्साह पूर्ण वातावरणात करण्यात आले. उपविभागीय अधिकारी जगदीश भंडारवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड, सपोनी बिरादार, पोलीस उपनिरीक्षक, झाडे, बाचेवाड यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी बंदोबस्त ठेवून सहकार्य केले. सर्व पदाधिकारी, मान्यवर मंडळी, दुर्गा मंडळाचे कार्यकर्ते सर्वांनी दुर्गा विसर्जन मिरवणुकीत सहभाग घेवून आनंद घेतला. संदीप पाटील गौड मित्र मंडळाच्या वतीने पुरी भाजी व बुंदीचा महाप्रसाद भाविकांसाठी ठेवण्यात आला होता.

## श्रीमती लक्ष्मीबाई खाकरे यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-श्रीमती लक्ष्मीबाई मुगाप्पा खाकरे यांचे



गुरुवार दि.२२ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर मरळक (बु.) येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात बापूराव खाकरे, सुभाष खाकरे यांच्यासह तीन मुली, जावई, सुना, नातवंड असा परिवार आहे. जि.प.च्या आरोग्य विभागातील कर्मचारी सुभाष खाकरे यांच्या त्या मातोश्री होत.

## जिल्ह्यात जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश लागू

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यात सलग विविध धार्मिक कार्यक्रम, मोर्चे, आंदोलने व रॅलींची रेलचेल असतानाच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनांकडून आंदोलनाची शक्यता आणि विविध सामाजिक मागण्यांवरून संघर्षाची संभाव्यता लक्षात घेता नांदेड जिल्हा प्रशासनाने खबरदारीचा मोठा निर्णय घेतला आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी किरण अंबेकर यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये संपूर्ण नांदेड जिल्ह्यात जमावबंदी व शस्त्रबंदीचे आदेश जारी केले आहेत.

हा आदेश दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपासून दि. ७ नोव्हेंबर २०२६ रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण नांदेड जिल्ह्यात लागू राहील. जिल्ह्यातील आगामी विविध कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता निदर्शनास आणून दिली आहे.

# पात्र शेतकऱ्यांना विनाविलंब पीक कर्ज द्या-जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

नांदेड/प्रतिनिधी-शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळविताना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, तसेच पात्र शेतकऱ्यांना विनाविलंब कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. त्यांनी आज नेरली येथील भारतीय स्टेट बँकेला अचानक भेट देऊन पीक कर्ज वितरणासह अन्य कर्ज प्रकरणांचा आढावा घेतला. यावेळी बँकेत उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणीही जाणून घेतल्या.

पीक कर्जासाठी शेतकऱ्यांकडून अनावश्यक कागदपत्रांची मागणी करून त्यांना त्रास देऊ नये. उपलब्ध सुविधांचा वापर करून ऑनलाइन सातबारा उतारा प्राप्त करावा आणि पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज अर्जांवर तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बँक अधिकाऱ्यांना दिल्या. कर्ज मंजुरीची प्रक्रिया सुलभ करून शेतकऱ्यांना वेळेत कर्ज उपलब्ध होईल, यासाठी आवश्यक दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.जिल्हाधिकाऱ्यांनी बँकेतील प्रलंबित कर्ज प्रकरणे, शेतकऱ्यांकडून प्राप्त अर्ज, आवश्यक कागदपत्रांबाबत निर्माण होणाऱ्या अडचणी आणि त्यावरील संभाव्य उपाययोजनांची माहिती घेतली. सामाईक क्षेत्रातील शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करून देताना येणाऱ्या अडचणींबाबतही त्यांनी बँक अधिकाऱ्यांशी चर्चा केली. अशा प्रकरणांमध्ये नियमानुसार योग्य पर्याय शोधून कर्ज वितरणाची कार्यवाही सुलभ करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.पीक कर्ज हे शेतकऱ्यांच्या शेतीविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी महत्त्वाचे असल्याने कर्ज वितरणात अनावश्यक विलंब होणार नाही, याची बँकांनी दक्षता घ्यावी. शेतकऱ्यांच्या अर्जांवर वेळेत निर्णय घेऊन पात्र लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्पष्ट केले.

# राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण काढण्यास प्रशासनाकडून दिरंगाई

## शेतकरी संघटनेचे नेते त्रिभूवनसिंह ठाकूर यांचा आरोप

किनवट/प्रतिनिधी-कोठारी ते धनोडा राष्ट्रीय महामार्ग (क्र.१६१-अ) वरील किनवट शहरातील अतिक्रमणे हटवण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, भोकर यांनी युद्ध पातळीवर नोटीसा बजावल्या परंतु विहीत मुदतीत अतिक्रमण हटाव प्रकरणी अंमलबजावणी करण्यास कुठे माशी शिंकली? असा शेतकरी संघटनेचे स्थानिक नेते त्रिभूवनसिंह ठाकूर यांनी संबंधित प्रशासनाला केला आहे.

अतिक्रमण धारकांना प्रशासनाने दिलेल्या १२ तारखेच्या अल्टिमेटमची मुदत संपूनही अतिक्रमणे जशीच्यातशीच असल्याने दिवसेंदिवस वाहतुकीची कोंडी निर्माण होत आहे. किनवट जिल्ह्यासाठी प्रयत्नशिल असल्यामुळे किमान आगामी शंभर वर्षाचा विचार करता रोड रुंदीकरणासाठी त्यागाची आणि योगदानाची गरज असल्याचे त्यांचे म्हणणे असून जिल्हाधिकाऱ्यांसह संबंधितांकडे निवेदने पाठवली आहेत. राष्ट्रीय महामार्ग १६१-अ, च्या हद्दीत येणारी किनवट शहरातील सर्व अतिक्रमणे अतिक्रमणधारकांनी ११ ऑक्टोबर पर्यंत स्वतःहून काढून घ्यावीत, अन्यथा १२ ऑक्टोबर रोजी प्रशासनामार्फत ती हटवली जातील, अशी सनसनाटी निर्माण करणाऱ्या नोटीसा राष्ट्रीय महामार्ग भोकर यांनी बजावल्या होत्या. मात्र तो सद्यस्थितीत फुसका बार ठरलाय. सर्वोच्च न्यायालयाची सुओ-मोटो रिट याचिका क्र.९/२०२५ चा संदर्भ आणि जिल्हाधिकारी यांच्या पत्राचा आधार देण्यात आला होता. मात्र, नोटीसीची मुदत उलटून दहा दिवसांपेक्षा जास्त काळ झाला तरी प्रत्यक्ष जागेवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. सद्या निवडणूक आचारसंहिता असल्यामुळे काम थंडावले असे म्हणायला गेल्यास हे काम जवळपास नऊ वर्षांपासून रेंगाळत ठेवलेले आहे. सर्व पक्की अतिक्रमणे जैसे थे स्थितीत असून हे थेट सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करीत असल्याचा ठपका देखील ठेवण्यात आला आहे. याबाबत शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते त्रिभुवनसिंह ठाकूर यांनी जिल्हाधिकारी, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त तसेच किनवटच्या उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन पाठवले आहे. या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्वरित हस्तक्षेप करून महामार्गावरील अतिक्रमण तात्काळ काढून प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याची मागणी केली आहे. कारणही तसेच आहे, मागच्या शंभर वर्षातील लोकसंख्या व वाहनसंख्या, आणि किनवट शहराच्या भविष्याचा वेध घेता, आगामी किमान शंभर वर्षाचे अवलोकन करता झपाट्याने लक्षणीय वाढत असलेली जनसंख्या व वाहनसंख्येची समिक्षा करणार की नाही? किनवट जिल्ह्याच्या निर्मितीसाठी जेव्हा मागणी केली जाते तेव्हा जिल्ह्याचे चित्र डोळ्यासमोर ठेऊन का होईना शहरातील राष्ट्रीय महामार्ग हा दूभाजकासह शंभर फुटाचा व्हावा यासाठी थोड्याफार त्यागासह योगदानाची नितांत गरज असल्याचे त्रिभुवनसींह ठाकूर यांचे म्हणणे आहे.

# हाताचे ठसे उमटत नसल्याने निराधारांचे अनुदान रखडले

देगलूर/प्रतिनिधी-वयोमानामुळे हाताची ठसे उमटत नसल्याने साठ वर्षावरील अनेक ज्येष्ठ नागरिकांना आधार प्रमाणीकरण करताना अडचणी येत आहेत. याचा परिणाम निराधार योजनेच्या लाभार्थ्यावरही होत असून, आधार प्रमाणीकरण पूर्ण होत नसल्यामुळे काही लाभार्थ्यांच्या अनुदानाचे पैसे रोखले गेल्याची माहिती मिळाली आहे. आधीच आर्थिक परिस्थितीशी संघर्ष करणाऱ्या ज्येष्ठ महिला व पुरुषांना या समस्येमुळे मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे.

निराधार योजना तसेच इतर शासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड अपडेट करण्यासाठी ज्येष्ठ महिला व पुरुष जात आहेत. लाभार्थी सेतू केंद्रात जाऊन आधार अपडेट करण्याचा प्रयत्न करतात. मात्र, वाढत्या वयामुळे बोटांची ठसे स्पष्टपणे उमटत नसल्याने त्यांचे काम पूर्ण होत नाही. वारंवार प्रयत्न करूनही आधार अपडेट होत नसल्याने अनेक ज्येष्ठ नागरिक निराश होऊन परतत आहेत. आवश्यक्य खर्चासाठी या पैशांचा आधार असतो. अशा परिस्थितीत केवळ बोटांची ठसे उमटत नसल्यामुळे लाभार्थ्यांना अडचणीचा सामना करावा लागणे ही गंभीर बाब असल्याची भावना व्यक्त होत आहे. आधार अपडेटसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या विशेष केंद्रापर्यंत जाणे, अनेक ज्येष्ठ नागरिकांना शक्य होत नाही. संबंधित कार्यालयाचा पत्ता, तिथे जाण्याची प्रक्रिया आणि उपलब्ध सुविधांची माहिती ही सर्वांना सहज मिळत नाही. त्यामुळे तालुका स्तरावर विशेष आधार अपडेट केंद्र सुरू करावे, फक्त तालुक्यामध्ये महाराष्ट्र ग्रामीण बँक मध्ये सुविधा आहे. मात्र तेथील आधार चालक हा ग्राहकांना उद्धट व चार ते पाच दिवस फिरायला लावत आहे, त्यामुळे ग्राहकांची गैरसोय होत आहे. तरी या ग्राहक सेवा केंद्र चालकाचे आधार केंद्र बंद करून पोस्ट ऑफिसमध्ये चालू करावे अशी मागणी जेष्ठ वयोवृद्ध नागरिकांमधून होत आहे.




मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आज (शुक्रवार) मतदान घेण्यात आले. माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोक चव्हाण यांनी मतदान केंद्राबाहेरील महायुतीच्या मतदार सहाय्य केंद्रास भेट देवून पदाधिकारी, कार्यकर्त्यांसोबत चर्चा केली. यावेळी आ.अमरनाथ राजूरकर, माजी उपमहापौर सतीश देशमुख तरोडेकर, संतोष मुळे व इतर उपस्थित होते.

# दसरा कोरडा गेला किमान दिवाळीला तरी आनंदाचा शिधा देण्याची मागणी

हदगाव/प्रतिनिधी-जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थिती, खरीप पिकांचे नुकसान, वाढती महागाई आणि रोजगाराच्या घटत्या संधींमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा परिस्थितीत दिवाळीपूर्वी राज्य सरकारने आनंदाचा शिधा योजना पुन्हा सुरू करावी, अशी जोरदार मागणी हदगाव विधानसभा क्षेत्रातील नागरिकांकडून होत आहे.

राज्य सरकारने २०२२ मध्ये सुरू केलेल्या या योजनेअंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांत साखर, खाद्यतेल, डाळी आदी जीवनावश्यक वस्तूंचा संच दिला जात होता. सध्याच्या आर्थिक संकटाच्या काळात या योजनेमुळे गरीब कुटुंबांना मोठा दिलासा मिळू शकतो. दुष्काळामुळे शेतकरी आणि शेतमजुरांचे उत्पन्न घटले असून, महागाईमुळे दैनंदिन खर्च भागविणेही कठीण झाले आहे. त्यामुळे दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, विधवा महिला आणि निराधार कुटुंबांना विशेष दिलासा देण्याची गरज व्यक्त होत आहे. गरीब कुटुंबांच्या घरातही दिवाळीचा आनंद फुलावा, यासाठी सरकारने आनंदाचा शिधा योजना तातडीने सुरू करावी. तसेच शिधा संचात गहू व इतर जीवनावश्यक वस्तूंचा समावेश करावा, अशी अपेक्षा ज्येष्ठ पत्रकार शाम लाहोटी यांनी व्यक्त केली. आता राज्य सरकार दिवाळीपूर्वी या मागणीची दखल घेऊन निर्णय घेणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.




मराठवाडा पदविधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी विष्णुपुरी येथील मतदान केंद्रावर भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

# उमरी येथे आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीतर्फे २ नोव्हेंबरला महामोर्चा

उमरी/प्रतिनिधी-अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने दि.२ नोव्हेंबर रोजी उमरीत आरक्षण व संविधानाच्या संरक्षणासाठी भव्य महामोर्चा आणि जाहीर सभा होणार आहे. या मोर्चाला रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

आरक्षण व संविधानाच्या संरक्षणासाठी तसेच अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा मोर्चा काढण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, भोकर रोड, उमरी येथून मोर्चाची सुरुवात होईल. त्यानंतर मोंढा मैदान, उमरी येथे जाहीर सभा होणार आहे. या कार्यक्रमाला सिद्धार्थ शिनगारे, शहिदास बनसोडे, एन. एस. फुलमगार आणि चंद्रप्रकाश ढेंगळेकर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीचे अध्यक्ष ॲड. भीमराव सवई, उपाध्यक्ष संदेश गायकवाड, सचिव भीमराव वाघमारे, नगरसेवक प्रतिनिधी अशोक झडते, कैलास सोनकांबळे, डी. जी. तुपसाखरे आणि गंगाधर गंगासागरे यांच्यासह समितीचे पदाधिकारी मोर्चाच्या आयोजनासाठी प्रयत्नशील आहेत. शिव-शाहू-आंबेडकरी चळवळीतील सर्व बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समिती, उमरीच्या वतीने करण्यात आले आहे.

# नरसी येथे जनावरांची अवैध वाहतूक करणारे वाहन पकडले



नायगाव/प्रतिनिधी-नायगाव येथील जनावर बाजारातून गोवंश कत्तलीसाठी घेऊन जाणाऱ्या वाहनावर रामतीर्थ पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत तीन गोवंश व एक म्हैस अशी चार जनावरे ताब्यात घेण्यात आली. पोलिसांनी वाहनासह एकूण ५ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२२ ऑक्टोबर रोजी दुपारी नायगाव येथील जनावराच्या आठवडी बाजारातून गोवंश कत्तलीसाठी पिकअप वाहन क्रमांक एमएच २६ सीएच-१५४२ मधून घेऊन जात असल्याची माहिती रामतिर्थ पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी नर्सी येथे सदर वाहन थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये तीन गोवंश व एक म्हैस आढळून आली. सदर जनावरांच्या कानाला एअरटॅग नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. तसेच यापूर्वी या पिकअप वाहनावर पोलीस ठाणे देगलूर येथे गुन्हा दाखल असल्याचे तपासात उघडकीस आले. या प्रकरणी चालक व जनावरांना रामतीर्थ पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाई दरम्यान एकूण ५ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# उपजिल्हा रुग्णालयातील ८९ लाखांच्या अपहार प्रकरणातील वरिष्ठ लिपिकास अटक

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर येथील उपजिल्हा रुग्णालयाशी संबंधित ८९ लाख रुपयांच्या कथित शासकीय निधी अपहार प्रकरणात देगलूर पोलिसांनी या प्रकरणातील वरिष्ठ लिपिक रावसाहेब रामकिशन मोरे यास बुधवारी दि.२१ ऑक्टोंबर रोजी अटक करण्यात आली.

देगलूर येथील उपजिल्हा रुग्णालयात ८९ लाख रुपयांच्या अपहार प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय पेरके यांच्या फिर्यादीवरुन देगलूर पोलीस ठाण्यात दि.२७ जुलै रोजी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. १४ जुलै २०२१ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत वेतनाच्या नोंदी सेवार्थ प्रणालीत नोंदवून देखील तयार करण्यात आली आणि ती कोषागार कार्यालयात सादर करण्यात आली. या प्रक्रियेद्वारे ८९ लाख ७० हजार १५० रुपये विविध कर्मचाऱ्यांच्या खात्यात वर्ग झाल्याचा आणि शासकीय निधीचा अपार झाल्याचे उघडकीस आले होते. या प्रकरणात वरिष्ठ लिपिक रावसाहेब मोरे यांना दि.२१ ऑक्टोंबर बुधवार रोजी सकाळी अटक करण्यात आली. त्यानंतर न्यायालयाने त्यांना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. दि.२२ ऑक्टोंबर रोजी पुन्हा देगलूर न्यायालयात हजर केले असता न्यायाधीश शरविंद राठोड यांनी त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. या प्रकरणातील वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश अंबादासराव देवणीकर यांना छत्रपती संभाजी नगर खंडपीठाने अटकपूर्व जामीन मंजूर केल्याचे समजते. शासकीय आरोग्य यंत्रनेशी संबंधित मोठ्या रकमेच्या कथित उपहार प्रकरणात आणखी कोणाची भूमिका समोर येते, निधीच्या व्यवहाराचे धागेदोरे कुठपर्यंत पोहोचतात आणि तपासातून कोणती नवीन माहिती उघड होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# कोजागिरी पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रम

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड येथील श्री गणाचार्य मठ संस्थानच्या वतीने रविवार, २५ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात दुर्गा सप्तशती पाठ, हवन, सुहासिनी पूजन तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. श्री गणाचार्य मठ संस्थान, मुखेड येथे आयोजित या धार्मिक सोहळ्यात पहाटेपासूनच भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत. गुरु माऊी श्री.१०८ डॉ.विरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांच्या सान्निध्यात सामूहिक दुर्गा सप्तशक्ती पाठ, हवन व सुहासिनी पूजन करण्यात येणार आहे. सकाळी ९ ते ११ या वेळेत दुर्गा सप्तशती पाठ, हवन व पूजन, तर सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत सुहासिनी पूजन होणार आहे. त्यानंतर दु.१ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यानिमित्त थोटे परिवार व अनिता कैलास पाटील, मुखेड यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक महोत्सवात सहभागी होवून दुर्गा सप्तशक्ती पाठ, पूजन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गणाचार्य मठ संस्थान, मुखेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## मराठवाडा पदवीधर...

बबन बारसे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.विठ्ठल पावडे, संजय कौडगे, ॲड.दिलीप ठाकूर, प्रा.राजू सोनसळे यांच्यासह विविध राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. मतदान केंद्राबाहेर पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत ४१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. मुख्य लढत महायुतीचे उमेदवार व विद्यमान आ.सतीश चव्हाण व राष्ट्रवादी काँग्रेस तसेच महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्यातच होत असून निवडणुकीचा निकाल धक्कादायक लागणार असल्याची चर्चा मतदारांमध्ये सुरु आहे.

## महापौर कार्यालयासह बिग बिंना आला...

याचा २७ नोव्हेंबरला कॉन्सर्ट होणार आहे, याच कॉन्सर्टमध्ये हल्ला करण्याची धमकी दिली गेली आहे. तर, दादरमधल्या ३ ते ४ शाळांनाही उडवून देण्याची धमकी मिळाली आहे. त्यासोबतच, ऐरोलीतल्या विब्योर शाळेला दुपारी १ वाजून ११ च्या सुमाराला उडवून देऊ अशी धमकी दिली गेली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे मुंबईच्या महापौरांचे कार्यालय दुपारी ३.११ वाजता उडवू अशी धमकी धमकीचा ई-मेल आल्यानंतर दादरमधल्या शाळांना सुट्टी दिली गेली. विद्यार्थ्यांना घरी पाठवून पोलिसांकडून शाळेत तपास मोहीम राबवण्यात आली आहे. या धमकीच्या संदेशात खलिस्तान चळवळ आणि इतर काही संशयित संघटनांचा थेट उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे केवळ खोडसाळपणा म्हणून याकडे न पाहता सुरक्षा यंत्रणांनी याला अत्यंत गांभीर्याने घेतले असून शाळा आणि रेसकोर्स परिसराची सुरक्षा तातडीने वाढवण्यात आली आहे. धमकीचा ई-मेल मिळताच सुरक्षा यंत्रणांनी तत्काळ शोधमोहीम राबवली. प्रमाणित कार्यपद्धतीनुसार ई-मेल मिळाल्यानंतर मुंबई पोलिसांनी कोणतीही हलगर्जी न दाखवता तत्काळ मानक कार्यपद्धती लागू केली आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४